पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा. शिक्षण समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ५

**सभावृत्तांत**

दिनांक - **०६/०९/२०१८** वेळ - दुपारी **२.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शिक्षण समितीची पाक्षिक सभा **गुरुवार** दिनांक **०६/०९/२०१८** रोजी दुपारी **२.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे - सभापती**
२. मा.बाबर शर्मिला राजू - उपसभापती
३. मा.बुर्डे सुवर्णा विकास
४. मा.सोनवणे शारदा हिरेन
५. मा.भोंडवे संगिता राजेंद्र
६. मा.तापकीर विनया प्रदीप (आबा)
७. मा.बनसोडे राजू विश्वनाथ
८. मा.काळे उषा दिलीप
९. मा.अश्विनी गजानन-चिंचवडे-पाटील

या शिवाय मा.शिंदे – प्रशासन अधिकारी ( प्राथमिक शिक्षण विभाग ), मा.शेख – उपनगरसचिव, मा.मुंढे – प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक शिक्षण विभाग), हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचा विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आला.**

विषय क्र.१) मनपाच्या शाळांमध्ये नाविन्यपुर्ण विज्ञान केंद्राची स्थापना ( सायन्स सेंटर ) करणेबाबत - मा.सुवर्णा बुर्डे, मा.शर्मिला बाबर यांचा प्रस्ताव.

---------

खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक – मा.सुवर्णा बुर्डे                                   अनुमोदक – मा.शारदा सोनवणे

मा.शिक्षण समितीची गुरुवार दिनांक ०६/०९/२०१८ ची पाक्षिक सभा (कार्यपत्रिका क्र.५) सोमवार दिनांक – १०/०९/२०१८ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

सभापती - सोमवार दिनांक – १०/०९/२०१८ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

**(सोनाली दत्तात्रय गव्हाणे)**
**सभापती**
शिक्षण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा. शिक्षण समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ५

**सभावृत्तांत**

( दिनांक ०६/०९/२०१८ ची तहकूब सभा )

दिनांक - **१०/०९/२०१८** वेळ - दुपारी **२.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शिक्षण समितीची दिनांक ०६/०९/२०१८ ची तहकूब सभा **सोमवार** दिनांक **१०/०९/२०१८** रोजी दुपारी **२.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे - सभापती**
२. मा.बाबर शर्मिला राजू - उपसभापती
३. मा.बुर्डे सुवर्णा विकास
४. मा.भोंडवे संगिता राजेंद्र
५. मा.तापकीर विनया प्रदीप (आबा)
६. मा.बनसोडे राजू विश्वनाथ
७. मा.काळे उषा दिलीप
८. मा.अश्विनी गजानन-चिंचवडे-पाटील

या शिवाय मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.शिंदे – प्रशासन अधिकारी ( प्राथमिक शिक्षण विभाग), मा.मुंढे – प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक शिक्षण विभाग), हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

दिनांक १६/०८/२०१८ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ०४) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

**(**मा.विनया तापकीर, मा.राजू बनसोडे, मा.उषा काळे व मा.अश्विनी चिंचवडे-पाटील हे सन्मा.सदस्य मा.प्रशासन अधिकारी शिक्षण समिती यांचे कामकाजाबाबत निषेध व्यक्त करुन सभागृहाबाहेर निघून गेले.**)**

**----------**

**सभा कामकाजामध्ये दाखल करणेत आलेला विषय घेणेत आला.**

ठराव क्रमांक – १८ विषय क्रमांक – ०१
दिनांक - १०/०९/२०१८
सुचक : मा.सुवर्णा बुर्डे अनुमोदक : मा.शर्मिला बाबर
संदर्भ :- मा.सुवर्णा बुर्डे, मा.शर्मिला बाबर यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका शिक्षण विभागाच्या प्राथमिक शाळांमध्ये शहरातील विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण दिले जाते. तरी महानगरपालिकेच्या शाळांमध्ये या सर्व अद्ययावत सुविधा

व शिक्षण उपलब्ध करुन दिल्यामुळे विद्यार्थ्याच्या संख्येमध्ये निश्चित वाढ होण्याची शक्यता आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शाळांमध्ये विविध अद्ययावत सोयी सुविधा उपलब्ध करुन दिल्यास आपल्या शाळेकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलून विद्यार्थी व पालक शाळांकडे आकर्षित होण्याची शक्यता आहे. याबाबत शालेय अभ्यासक्रमा व्यतिरिक्त एक नाविन्यपूर्ण विज्ञान केंद्र स्थापन केल्यास मनपा शाळांतील विद्यार्थ्यांचा वैज्ञानिक दृष्टीकोन वाढण्याची शक्यता आहे. तसेच त्यांना अनेक विज्ञानांच्या संकल्पना स्वत: हाताळता येतील विज्ञान सोपे वाटेल किंबहूना त्यांना विज्ञानाची गोडी निर्माण होऊ शकेल विद्यार्थ्यांचा अभ्यास चांगला व्हावा. त्यांचा शास्त्रीय दृष्टीकोन वाढावा त्यांना अनेक प्रश्न पडावेत, त्यांना सायन्स, गणित विषय नीट समजावेत व त्या विषयात त्यांनी रस घ्यावा म्हणून या पध्दतीचे सायन्स सेंटर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शाळांमधून निर्माण व्हायला हवेत ही फार मोठी गोष्ट होणार आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांना सर्व प्रयोग स्वत: करायला उद्युक्त करुन विद्यार्थी व शिक्षक यांच्यामध्ये मैत्रीपूर्ण संबंध कसे निर्माण करायचे, मुलांनी प्रश्न विचारावेत यासाठी त्यांना प्रवृत्त कसे करायचे, त्याचा वापर सायन्स सेंटरमध्ये कसा करावा इत्यादी अशा अनेक गोष्टींचा आंतर्भाव या कार्यशाळेमध्ये होईल हा प्रकल्प महानगरपालिकेच्या सर्व प्राथमिक शाळांच्या आवारात सायन्स सेंटर स्थापना करण्यासाठी आवश्यक त्या बाबींची पूर्तता करणे आवश्यक असून या प्रकल्पासाठी येणा-या खर्चास तरतूद करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(सोनाली दत्तात्रय गव्हाणे)**
**सभापती**
शिक्षण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/५९४/२०१८
दिनांक : १०/०९/२०१८

**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.